नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.२४७**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ३ याची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - अतुल वासुदेव पाटील,
वय - ३४ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. - कुंड बु.,ता. मलकापुर जि.बुलडाणा

**<u>शपथेवर साक्षीदाराचा पुढील उलटतपास आरोपी क्र. २ व ३ तर्फे विधीज्ञ तांदूळकर यांच्या मार्फत पुन्हा सुरू-</u>**

७. शेतामध्ये जो माल उत्पादीत होतो तो माल कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत विकला जात असल्याचे मला माहीत नाही. बाजार समीतीमार्फत जे अडते असतात त्यांच्या मार्फत अधिकृत व्यापारी माल खरेदी करु शकत असल्याचे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, शेतातील माल हा बाजार समीतीतील अधिकृत मापारी मार्फत मोजल्या जातो. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रक्रिया ही माझ्या प्रकरणात झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समीतीतील मापारी, अडतदार व बाजार समितीचे शुल्क आकारले जात असतात. मी विकलेल्या कापसाचे मापारी शुल्क, अडतदार शुल्क आणि बाजार शुल्क दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी असा कोणताच व्यवहार केलेला नसल्यामुळे असे कोणतेही नमूद शुल्क भरलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र. २ व ३ यांना चेक अनादरीत झाल्याबाबत माझ्या वकीलांमार्फत नोटीस पाठविल्या होत्या. त्या नोटीसीला आरोपी क्र. २ व ३ यांनी उत्तर पाठविल्याचे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी आरोपी क्र. १ विरुध्द चेक अनादरीत झाल्याबाबत प्रकरण दाखल केलेले असून ते सध्या प्रलंबित आहे. आरोपी क्र. २ व ३ यांना जी नोटीस दिली होती, त्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या चेकवर आरोपी क्र. २ व ३ यांच्या सह्या नव्हत्या. मी आरोपी क्र. २ व ३ यांच्याविरुध्द चेक अनादरीत झाल्याबाबतचे प्रकरण दाखल केलेले नाही. मी आरोपी क्र. २ व ३ यांच्याविरुध्द रक्कम वसुल होऊन मिळण्याबाबत इतर दुसरे प्रकरण दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ व ३ यांनी नोटीसला दिलेल्या उत्तराचे मला समाधान झाले असल्यामुळे मी त्यांच्याविरुध्द कोणतीही कार्यवाही केली नाही. आता मला समरी फौजदारी केस क्र. ९७६/२०२३ मधील फिर्यादीची

प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर माझ्या सांगितल्याप्रमाणे तयार करण्यात आला आहे. त्यास **निशाणी क्र. २५८** देण्यात आला.

८. माझ्याकडील माल नेल्यापासून ते आजपर्यंत मी एकाही आरोपीविरुध्द लेखी तक्रार पोलीस स्टेशनला केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अतुल मधुकर पाटील यांच्या सांगण्यावरून पोलीसांना जबाब दिला व त्यांच्या सांगण्यानुसार आजरोजी साक्ष देत आहे. मला पोलीसांनी लेखी सुचना अथवा तोंडी सुचना जबाब देण्याकरिता दिली नव्हती. पोलीसांनी माझे काय बयाण नोंदवले हे माझ्या लक्षात नाही. साक्षीदार परत स्वतःहून सांगतो की, मला माहीती नाही. आरोपी क्र. २ व ३ यांनी कापूस मोजल्याबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही व तसा पुरावा मी पोलीसांना देखील दिलेला नाही. माझ्याकडील कापूस हा तोल काट्यावर मोजल्याबाबत कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ व ३ चा व्यवहाराशी काहीही संबंध नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी अतुल पाटील हे ग्रामपंचायतला मागच्या १० वर्षापासून ग्रामपंचायतमध्ये निवडून येत आहेत. ते कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते असल्याबाबत मला माहीती नाही. राजेंद्र बोरले हे भाजप पक्षाचे कार्यकर्ते असल्याबाबत मला माहीत नाही. अतुल पाटील ज्या पक्षाचे सदस्य आहेत त्याच्या विरुध्द पक्षामध्ये राजेंद्र बोरले काम करत असल्याचे मला माहीत नाही. आरोपी क्र. ३ हा आरोपी क्र. २ चा नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ हा राजकीय विरोधक असल्यामुळे व आरोपी क्र. ३ चा नातेवाईक असल्यामुळे त्यांच्या विरुध्द फिर्यादीने सदरचे खोटे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अतुल पाटील यांच्या पक्षातील जवळचा सदस्य असल्यामुळे मी त्यांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ५ तर्फे विधीज्ञ एस. एम. चौरडीया यांच्यामार्फत-</u>**

१०. आरोपी क्र. २ व ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारला.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ६, ७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ जी.डी. पाटील यांच्यामार्फत सुरू-</u>**

११. मी आरोपी क्र. ६, ७, ९ व १४ यांना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा सदर आरोपींशी कोणताही व्यवहार नाही व त्यांच्याशी माझे काही देणेघेणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र. १ ते ३ यांना सोडून मी इतर आरोपींना ओळखत नाही व त्यांचा माझ्याशी कशाही प्रकारचा संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र. २ व ३ यांना माझ्या गावातील असल्यामुळे मी त्यांना ओळखतो.

<u>**उलटतपास आरोपी क्र. ८ तर्फे विधीज्ञ एन.एस. तायडे यांच्यामार्फत-**</u>

१२. आरोपी क्र. ६ , ७, ९ व १४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारला.

<u>**उलटतपास आरोपी क्र. १३ तर्फे विधीज्ञ श्री बी.एस वानखेडे यांच्यामार्फत-**</u>

१३. उर्वरीत सर्व आरोपींचा घेतलेला उलटतपास स्वीकृत करण्यात आला .

<u>**उलटतपास आरोपी क्र. १० तर्फे विधीज्ञ श्री एस.डी.मराठे यांच्यामार्फत-**</u>

१४. उर्वरीत सर्व आरोपींचा घेतलेला उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.07.03 10:35:30 +0530

दिनांक : २३/०६/२०२५

**(पी.एस. ठाकरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर